

# शिक्षणाचा बाजार झालाय

पुणे, दि. १ (प्रतिनिधी) - एखाद्या संस्थेमध्ये शिक्षक किंवा शिपायाची भरती त्याची किंमत ठरवून होते. वडील अध्यक्ष असलेल्या शिक्षण संस्थेत मुलगा मुख्याध्यापक, तर सून शिक्षिका असते. अशाप्रकारे शिक्षण संस्था प्रायव्हेट लिमिटेड कंपन्या झाल्या असून शिक्षणाचा बाजार झाला आहे, अशी खंत खुद्द उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री राजेश टोपे यांनी व्यक्त केली.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न कॉलेजच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन टोपे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. शिक्षण संचालक प्रकाश गायकवाड, महापौर मोहनसिंग राजपाल, पुणे विद्यापीठाचे कुलसचिव माणिक जाधव, संस्थेचे कार्याध्यक्ष गजानन एकबोटे, कार्यवाह श्यामकांत देशपांडे, प्राचार्य राजेंद्र झुंजारराव, यावेळी उपस्थित होते.

शिक्षणमंत्री टोपे म्हणाले, शिक्षण क्षेत्रामध्ये स्पर्धा वाढली आहे. त्याचा फायदा संस्थाचालक घेत आहेत. ही शोकांतिका आहे. प्रत्यक्षात स्पर्धेचा फायदा विद्यार्थ्यांना मिळाला पाहिजे, या दृष्टीने प्रयत्न करण्याची गरज आहे. गेल्या वर्षभरात कॉलेजच्या मान्यतेसाठी मोठ्या प्रमाणावर प्रस्ताव आले. याचा अर्थ त्यांचे शिक्षणावरील प्रेम वाढले असा नसून वाढत्या बाजारीकरणाचा फायदा घेण्यात येत आहे.

ते म्हणाले, मॉडर्न एज्युकेशन सोसायटीचे शिक्षण क्षेत्रातील कार्य उल्लेखनीय असून, त्यांनी स्वायत्त विद्यापीठ म्हणून मान्यता मिळविण्यासाठी प्रस्ताव द्यावा.

प्राचार्य झुंजारराव यांनी प्रास्ताविक केले. वंदना जोशी यांनी सूत्रसंचालन केले. श्यामकांत देशमुख यांनी आभार मानले.

**अभ्यासक्रम ठरविण्यासाठी स्वायत्तता देणार**

अभ्यासक्रम ठरविण्यासाठी महाविद्यालयांना स्वायत्तता देण्याविषयी सरकार विचार करत आहे. त्यामुळे विविध उद्योगांना आवश्यक असणारे कुशल मनुष्यबळ पुरविण्यासाठी महाविद्यालयांना स्वतःच त्याप्रकारचे अभ्यासक्रम तयार करता येतील, हा त्यामागचा हेतू आहे, असे टोपे यांनी स्पष्ट केले.

**पुण्यात लवकरच 'ट्रिपल आयटी'**

माहिती-तंत्रज्ञान क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी आणि या क्षेत्रात मनुष्यबळाची निर्मिती करण्यासाठी पुण्यामध्ये इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी स्थापन करण्यात येणार आहे. पुण्यातील चाकण, खेड किंवा शिरुर येथे हा प्रकल्प असणार प्रस्तावित आहे.

## ८ जुलै रोजी कॉलेजना मान्यता देणार

राज्यात नव्याने सुमारे शंभर कॉलेज सुरू करण्याचा विविध संस्थांचा प्रस्ताव आहे. मात्र, या संदर्भातील प्रकरण सर्वोच्च न्यायालयामध्ये सुरू असल्यामुळे अद्याप वाढीव तुकड्या आणि कॉलेजना मान्यता देण्यात आलेली नाही. मात्र, ८ जुलै रोजी न्यायालयाने आपल्या निर्णयाला स्थगिती दिल्यास त्यांना त्वरित मंजुरी देण्यात येईल, असे टोपे यांनी सांगितले.